आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

८ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- हरियाणामध्ये भाजपाची तर जम्मू काश्मीर विधानसभेत नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस आघाडीची बहुमताकडे वाटचाल
- केंद्रीय प्रत्यक्ष कर नियंत्रण मंडळाकडून प्राप्तीकर कायद्याच्या सर्वसमावेशक पुनरावलोकनासाठी अंतर्गत समितीची स्थापना
- ७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं आज नवी दिल्ली इथं राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण होणार
- वाशिम जिल्ह्यातल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या दूरदृश्य प्रणालीद्वारे होणार
- आर्क्टिक खुल्या बॅडमिंटन स्पर्धेला फिनलँड इथं आजपासून सुरुवात

**आणि**

- शेअर बाजारातल्या घसरणीला लगाम

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मिर तसंच हरियाणा विधानसभा निवडणूकीच्या मतमोजणीला आज सकाळी ८ वाजल्यापासून सुरुवात झाली. जम्मू काश्मीरमधे आतापर्यंत ४० जागांचे निकाल जाहीर झाले असून त्यात १९ ठिकाणी नॅशनल कॉन्फरन्सचे उमेदवार तर १४ जागांवर भाजपा उमेदवार विजयी झाले आहेत. तसंच काँग्रेस उमेदवार २ आणि पीडीपी उमेदवार २ ठिकाणी विजयी झाले आहेत. माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला बडगाम मतदारसंघातून विजयी झाले असून

गंदेरबाल मतदारसंघात आघाडीवर आहेत. आतापर्यंत मिळालेल्या कलांनुसार एकूण ९० मतदारसंघांपैकी २२ ठिकाणी नॅशनल कॉन्फरन्स, १५ ठिकाणी भाजपा, तर ४ ठिकाणी काँग्रेस उमेदवार आघाडीवर आहेत. पीडीपीचे उमेदवार २ ठिकाणी तर अन्य उमेदवार ४ ठिकाणी आघाडीवर आहेत.

नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुक अब्दुल्ला यांनी मतदारांचे जाहीर आभार मानले आणि ओमार अब्दुल्ला नवीन सरकारमधे मुख्यमंत्री होतील असं जाहीर केलं. हरियाणात ९० मतदारसंघांपैकी ४६ ठिकाणी भाजपा उमेदवार तर २९ ठिकाणी काँग्रेस उमेदवार आघाडीवर आहेत. १३ जागांचे निकाल जाहीर झाले असून काँग्रेसचे ९ आणि भाजपचे ४ उमेदवार विजयी झाले आहेत. यात ऑलिम्पिक पदक विजेती कुस्तीपटू विनेश फोगाट जुलाना मतदारसंघातून काँग्रेसकडून विजयी झाल्या आहेत. मुख्यमंत्री नायबसिंग सैनी लडवा मतदारसंघात आघाडीवर आहेत.

**<><><><>**

हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा खोटारडेपणा उघडा पडला, अशी प्रतिक्रीया भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. देशात २०२९पर्यंत भाजपाचं सरकार असल्याने आता राज्यालाही डबल इंजिन सरकारची गरज असल्याचं हरियाणाच्या आणि जम्मू काश्मीरच्या जनतेला कळून चुकलं आहे. असं ते म्हणाले. महाराष्ट्रातही महायुतीला भरघोस मतं मिळतील आणि डबल इंजिन सरकार येईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><>**

केंद्रीय प्रत्यक्ष कर नियंत्रण मंडळाने १९६१च्या प्राप्तीकर कायद्याच्या सर्वसमावेशक पुनरावलोकनावर देखरेख करण्यासाठी अंतर्गत समितीची स्थापना केली आहे. या समितीचा उद्देश प्राप्तीकर कायद्याच्या स्वरुपाला संक्षिप्त, स्पष्ट आणि

सुलभ करणे हा असून त्यामुळे कायदा समजून घेण्यास मदत होणार आहे. कायद्याचं पुनरावलोकन झाल्यानंतर त्याबाबत होणारे वाद आणि खटले यांचं प्रमाण घटावं तसंच कराच्या आकारणीबाबत अधिक निश्चितता यावी हा या मागचा उद्देश असल्याचं केंद्रीय अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे. या कायद्याच्या पुनरावलोकनासाठी अर्थमंत्रालयाने संबंधित तज्ञ आणि जनतेकडून सूचना मागवल्या आहेत. या सूचना आयकर विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर जमा करता येतील, असं मंत्रालयानं कळवलं आहे.

**<><><><><>**

वाशिम जिल्ह्यातल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या दूरदृश्य प्रणालीद्वारे होणार आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या महाविद्यालयाला दोन वर्षांपूर्वी राज्य आणि केंद्र सरकारने मंजुरी दिली होती.

**<><><><><>**

तळागाळातल्या नागरिकापर्यंत आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितलं. नागपूर इथं एम्स अर्थात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशातल्या आरोग्य सुविधांमध्ये सातत्याने वाढ होत आहे, डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरवणं ही सरकारची प्राथमिकता आहे, असंही जाधव म्हणाले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थी संख्या वाढवण्याच्या निर्णयाचाही त्यांनी यावेळी पुनरुच्चार केला.

नागपूर एम्स मध्ये अत्यंत कमी दरात वैद्यकीय सुविधा पुरवल्या जातात, इथं दररोज साडेचार हजार रुग्ण उपचार घेतात अशी माहिती एम्सचे कार्यकारी संचालक डॉक्टर प्रशांत जोशी यांनी दिली. या कार्यक्रमात एम्स नागपूरचे अध्यक्ष

डॉक्टर विकास महात्मे, खासदार अजित गोपचडे आणि श्यामकुमार बर्वे यांच्या उपस्थितीत यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आलं.

<><><><><>

राज्यात महागाई, बेरोजगारी यासारख्या समस्या आहे. छोट्या मोठ्या सवलती देऊन नागरिकांच्या या समस्या दूर होणार नाही, असं प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केलं. मुंबईत आयोजित राज्यव्यापी वज्र निर्धार परिषदेत ते बोलत होते. भाजपाची साथ सोडली म्हणजे हिंदुत्व सोडलं नाही. त्यांच्या कर्मकांडाला विरोध म्हणून साथ सोडली असं ते म्हणाले.

<><><><><>

७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं आज नवी दिल्ली इथं राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण होणार आहे. अभिनेते मिथून चक्रवर्ती यांना यावेळी दादासाहेब फाळके पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे. याबरोबरच चित्रपट निर्मिती आणि अभिनयासाठीच्या इतर पुरस्कांरांचंही वितरण होणार आहे. कन्नड चित्रपट कांतारा मधल्या अभिनयासाठी ऋषभ शेट्टीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार, तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार तमिळ चित्रपट थिरूचित्रमबलमसाठी नित्या मेनन आणि गुजराती चित्रपट कच्छ एक्सप्रेससाठी मानसी पारेख यांना देण्यात येणार आहे. यासह अनेक पुरस्कारांचं वितरण यावेळी होईल.

<><><><><>

मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या मार्गाची बांधणी, आरेखन आणि सामग्री पुरवठ्याकरता राष्ट्रीय हाय स्पीड रेल्वे महामंडळानं पात्र भारतीय आणि जपानी कंपन्यांकडून निविदा मागवल्या आहेत. मुंबईचं वांद्रे- कुर्ला संकुल ते गुजरातमधल्या झारोली स्थानकापर्यंत ३१४ किलोमीटर लांबीच्या बांधकामाचा त्यात समावेश

आहे. बुलेट ट्रेनच्या मार्गाचा हा अखेरचा टप्पा असेल. महाराष्ट्रातली ४ स्थानकं आणि ठाण्याजवळ डेपोचं बांधकामही या टप्प्यात होईल.

<><><><><>

मुंबईच्या आरे कॉलनी ते बांद्रा कुर्ला संकुल या भुयारी मेट्रोमार्गावर वातानुकूलित आणि जलद प्रवासाचा लाभ काल पहिल्याच दिवशी सुमारे १५ हजार प्रवाशांनी घेतला. सुमारे साडेबारा किलोमीटर लांबीच्या या मेट्रो मार्गावर कामाच्या दिवशी सकाळी साडेसहा ते रात्री साडेदहा या वेळेत तर रविवारी सकाळी साडेदहा ते रात्री साडेदहा अशी वाहतूकसेवा उपलब्ध राहील. या मेट्रोमुळे रस्त्यावरच्या वहतुकीत सुमारे ३५ टक्के घट अपेक्षित आहे.

<><><><><>

मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळातर्फे मुंबईतील विविध गृहनिर्माण योजनांतर्गत उभारण्यात आलेल्या २ हजार ३० सदनिकांच्या विक्रीसाठी अनामत रकमेसह प्राप्त १ लाख १३ हजार ८११ पात्र अर्जांची संगणकीय सोडत आज काढण्यात आली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि इतर मान्यवर उपस्थित होते. सोडतीमधील विजेत्या अर्जदारांची यादी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या वेबसाईटवर आज संध्याकाळी ६ वाजता प्रसिद्ध केली जाणार आहे.

<><><><><>

नांदेड इथं येत्या गुरुवारी १० ऑक्टोबर रोजी महिला सक्षमीकरण मेळावा होणार आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महिला आणि बालकल्याण मंत्री,

ग्रामविकास मंत्री उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याद्वारे राज्य सरकारच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला जाणार आहे.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारात आठवडाभर सुरू असलेली घसरण आज थांबली. व्यवहारादरम्यान सेन्सेक्स ७०० हून अधिक तर निफ्टी सुमारे अडीचशे अंकांनी वधारला होता. सध्या सेन्सेक्स सुमारे ५०० अंकांनी वधारून ८१ हजार ५०० अंकांच्या वर व्यवहार करतो आहे. निफ्टी सुमारे २०० अधिक अंकांनी वधारून २५ हजारांच्या जवळपास आहे.

<><><><><>

वाशिम जिल्ह्यात देवठाणा इथं एका शेतात नुकतंच कापणी झालेलं सोयाबीन आगीत जळून खाक झालं. सुमारे दोन हेक्टर शिवारातलं हे उत्पादन होतं. गावकऱ्यांच्या मदतीने ही आग आटोक्यात आणली.

<><><><><>

रत्नागिरीतमधल्या रत्नदुर्ग किल्ल्यावर उभारण्यात आलेल्या शिवसृष्टीच्या पहिल्या टप्प्याचं लोकार्पण पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते काल झालं. शिवसृष्टीत उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचं लोकार्पणही सामंत यांनी केली. ही शिवसृष्टी जे जे स्कूल ऑफ आर्ट्सच्या कलाकारांनी साकारली असून दोन महिन्यात हिचं काम पूर्ण होईल, असं सामंत यावेळी म्हणाले.

दरम्यान, रत्नागिरी शहर स्मार्ट सिटी म्हणून विकसित करण्यासाठीच्या कामाला मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते काल सुरुवात झाली. शहरातल्या शाळा, तलाव, पदपथ विकसित करण्यासह सांडपाणी व्यवस्था भक्कम करण्यावर भर दिला जाणार असल्याचं सामंत यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बांबू लागवड आणि प्रक्रीया चळवळीचे प्रणेते पाशा पटेल यांना नरेडको या बांधकाम व्यावसायिकांच्या संघटनेनं हरित नायक पुरस्कार देऊन गौरवलं आहे. बांबू आधारित उद्योगांना व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल आणि बांधकाम क्षेत्रात बांबूच्या वापराला प्रोत्साहन दिल्याबद्दल हा पुरस्कार त्यांना देण्यात आला आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ पत्रकार, चित्रपट समिक्षिका आणि लेखिका नीला उपाध्ये यांचं काल रात्री मुंबईत चेंबुर इथं निधन झालं. त्या ७९ वर्षांच्या होत्या. चेंबुरच्या चरई विद्युत दाहिनीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<><><><><>**

फिनलँड इथं आर्क्टिक खुल्या बॅडमिंटन स्पर्धेला आजपासून सुरुवात होणार आहे. भारताचे पीव्ही सिंधू, किदांबी श्रीकांत आणि लक्ष्य सेन यांच्यासह १२ क्रिडापटू स्पर्धेत सहभागी होत आहेत. या महिन्याच्या १३ तारखेपर्यंत या स्पर्धा होणार आहे.

**//<><><><><>//**